## यावल पं.स.सभागृहात तक्रार निवारण सभा

यावल । प्रतिनिधी

पंचायत समिती सभागृहात दि.२३ जून रोजी सकाळी १०.३० वाजता तक्रार निवारण सभा चोपडा यावल मतदार संघाचे आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे तसेच यावल रावेर मतदार संघाचे आ.अमोल हरिभाऊ जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन ग्रामपंचायत महिला बालकल्याण शिक्षणाधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा कृषी विकास अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. यावल तालुक्यातील ज्या काही तक्रारी असतील व गावा गावच्या काही समस्या असतीलत्या तक्रारीचे निरसन या ठिकाणी केले जाईल ज्यांची खरोखर समस्या असेल त्यांनी या प्रसंगी उपस्थिती द्यावी जेणेकरून आपल्या गावचा प्रश्न सोडवला जाईल यावेळी तालुक्यातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी उपस्थिती द्यावी असे याव ल प स गटविकास अधिकारी सौ.मंजुश्री गायकवाड यांनी आवाहन केले आहे.



## मंगरूळ जि.प.प्रा.केंद्र शाळेत गणवेश वाटप

मंगरूळ, ता.पारोळा । वार्ताहर

येथील जि. प. प्राथमिक केंद्र शाळेत शाळेच्या पहिल्या दिवशी दि.१६ रोजी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व मोफत पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले. गावात प्रभात फेरी व जनजागृती करण्यात आली. पहिल्याच दिवशी १०० विद्यार्थी क्लीन दाखल करण्यात आली. शा.पो.आहारात गोड पदार्थ जिलेबी वाटण्यात आली. कार्यक्रमाला गावातल्य सरपंच व सर्व ग्रा.पं.सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, पोलीस पाटील, युवकमंडळ, पत्रकार, ग्रामस्य पालक कार्यक्रमाला उपस्थित होते. जिल्हाधिकार्य यांचे कडील आदेशांन्वये १०० शाळांना भेटी देणे या उपक्रमांतर्गत एस.पी. पाटील (निवडणूक नायब तहसिलदार) यांनी शाळेला भेट देवून मार्गदर्शन केले. शाळेत मोठ्या उत्साहात शाळा प्रवेशोत्सव साजय करण्यात आला. यासाठी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले.

## लोहारा येथे आधार केंद्राची मागणी

लोहारा, ता.पाचोरा । वार्ताहर

शासनाने सर्व शासकीय लाभाच्या योजना व ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्ड सक्तीचे केले असल्याने जन्म झालेल्या बाळाचेही आधार कार्ड काढावे लागत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून लोहारा येथील दोघे आधार केंद्र बंद करण्यात आले असल्यामुळे. ० ते ५ वर्ष वयोगटातील लहान बालकांचे आधार कार्ड काढण्यासाठी नागरिकांना खाजगी वाहनाला ८०० ते १००० रुपये खर्च करून पाचोरा किंवा जामनेर जावे लागत असल्यामुळे आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. लहान बाळांचे आधार कार्ड काढणे मोफत असले तरी तालुक्याच्या ठिकाणी जावं लागत असल्याने पालकांना आर्थिक भारासह मानसिक त्रास होत आहे. लोहारा तालुक्यातील लोकसंख्येने क्रमांक तीनचे गाव असून सुद्धा आधार केंद्राची सुविधा उपलब्ध नसल्याने माननीय जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी लहान बालक यांच्या नवीन आधार नोंदणी व इतर व्यक्तींच्या आधार दुरुस्तीसाठी तात्काळ नवीन आधार केंद्र सुरू करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## वैद्यकीय अधिकाऱ्यावर विनयभंगाचा गुन्हा

चाळीसगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील तरवाडे गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी याने पुनर्नियुती प्रसण्यावर सही घेण्यासाठी माझ्या मित्राच्या दुकानावर या असे बोलून आरोग्य सेविकेला अश्लील भाषा वापरून तिच्या मनास लजा उत्पात होईल असे कृत्य केल्याची घटना दि.२ जून रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी महिलेने चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशला दिलेल्या फिर्यादीवरून प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैदयकिय अधिकारी अजयसिंग राजपूत याच्या विरोधात भादवी कलम ५०९, ॲसीटी १९८९ चे कलम ३(१), (डब्ल्यू), (२) प्रमाणे गुन्हा दखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी करीत आहेत.

## वीजतारेचा धक्का लागून बैलाचा मृत्यू

पाचोरा । प्रतिनिधी

तालुक्यातील पुनगाव येथील शेतकरी ज्ञानेश्वर नारायण कोळी (आमले) हे नेहमी प्रमाणे आपल्या मांडकी शिवारातील शेतात बैलगाडी घेऊन गेले होते, बैलगाडी शेतात गेल्यावर बैल बांधावर गेला असता जमीनीवर तुटून पडलेल्या विजतारांचा स्पर्श झाल्याने बैल जागीच गतप्राण झाला. असुन शेतकरी बचावला आहे. घटनास्थळी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ.अंकुश धौड यांनी पाहणी करून शवविच्छेदन केले, तसेच तलाठी काकडे व पोलीस पाटील प्रविण ठाकुर, पोलीस कर्मचारी सोनवणे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. विज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता आम्ही लवकरच घटनास्थळी जात असल्याचे सांगितले.काही दिवसांपूर्वी झालेल्या वादळीवाऱ्यासह पावसामुळे बऱ्याच ठिकाणी विजेच्या तारा व विजेचे खांब पडले होते काही ठिकाणी विजेचे खांब व तारांची दुरुस्ती झाली आहे तरी काही ठिकाणी अजूनही विजेच्या तारा व विजेचे खांब पडलेल्या स्थितीतच आहेत. शेतकऱ्याचे जवळपास पन्नास ते पंचावन्न हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

## बिडगाव जि.प.शाळेत वर्ग खोल्याच नसल्याने चिमुकल्यांना...

# पहिल्याच दिवसापासून व्हरांड्यावर बसून शिक्षण घेण्याची वेळ

धानोरा, ता.चोपडा । वार्ताहर

'माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत तालुक्यातून दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या बिडगाव जि.प.शाळेत पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत झाले. नविण कपडे, पुस्तकेही मिळाली, मात्र शाळेत बसायला वर्ग खोल्याच नसल्याने चक्क पहिल्याच दिवसापासून या चिमुकल्यांना शाळेच्या व्हरांड्यावरच बसून शिक्षण घेण्याची दुर्दैवी वेळ आली आहे.

बिडगाव जि.प.शाळेत एक ते चार वर्ग आहेत चारही वर्ग मिळुन तब्बल ११५ विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. शिक्षक संख्याही पुर्ण आहे. येथील शिक्षणाचा दर्जा ही उत्तम आहे. 'माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत शाळेने गेल्याच वर्षी तालुक्यातून दुसरा क्रमांकही पटकावला होता. मात्र येथे असलेल्या चार शाळा खोल्यांपैकी एक १९६५ वर्षी बांधली असून ती जिर्ण झाल्याने निर्लेखनासाठी (पाडुन टाकण्यासाठी) प्रस्ताव पाठवला आहे. तर दुसऱ्या शाळाखोलीचे शाळा उघडण्याच्या काही दिवस आधीच वादळात संपूर्ण पत्रे उडून गेले आहेत. त्याची पं.स.चे गटविकास अधिकारी वसावे विस्तार अधिकारी जे.पी पाटील यांनी पाहणीही केली होती. मात्र ती अद्याप तशीच पडून आहे. तर दोन खोल्या अतिशय जिर्ण झाल्या आहेत. त्यांना ग्रामपंचायतने आताच दुरुस्त करून दिल्याने थोडा दिलासा मिळाला असला तरी येथे वर्ग चार व खोल्या दोनच अशी अवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी उत्साहात शाळेत तर येतात मात्र त्यांना शाळेच्या खोलीत बेंचवर बसून शिक्षण घेणे काही नशिब होत नाही. दोन वर्गात विद्यार्थी बसतात मात्र दोन वर्गाचे त्यात नुकताच आयुष्यातील शिक्षणाच्या दारात पाय ठेवणाऱ्या पहिली वर्गाच्या विद्यार्थ्यांसह सह दुसरीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शाळेच्या व्हरांड्यावरच खाली बसुन शिक्षण घ्यावे लागत आहे. येथे नवीन दोन वर्ग खोल्यांची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी वारंवार पाठपुरावा करूनही उपयोग होत नाही. शासनाने २००९ ला शिक्षण हक्क कायदा करून सर्वांना सोईयुक्त व सक्तीचे शिक्षण देणे हे शासनाचे कर्तव्यच असल्याचे जाहीर केले आहे. मात्र तरीही येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांना हक्काचे शिक्षण घेण्यासाठी बसायला वर्ग खोल्याही मिळत नसल्याची दुर्दैवी अवस्था येथे आहे . त्यामुळे पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांकडून तिव्र संताप व्यक्त केला जात आहे.



वर्ग खोल्यांअभावी शाळेच्या व्हरांड्यावर बसुन शिक्षण घेणारे विद्यार्थी.




वादळात पत्रे उडालेली शाळा खोली अद्यापही तशाच अवस्थेत दिवस आहे.

> शाळा दुरुस्ती व नविन वर्ग खोलीसाठी शिक्षण विभागाकडून त्वरित माहीती घेऊन शक्य ती उपाययोजना तात्काळ करण्यात यईल.
>
> **–अनिल विसावे, प्र.गटविकास अधिकारी पं.स.चोपडा**

# वीज पडून मृत्यू पावलेल्या तिघांच्या कुटुंबांना आठ लाखांची शासकीय मदत ; आ.मंगेश चव्हाण यांचा पाठपुरावा

चाळीसगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघले कोंगानगर परिसरात शेतात कापूस लावणीचे काम सुरू असताना आकाशातून कोसळलेल्या वीजेच्या जोरदार तडाख्याने एकाच कुटुंबातील तिघा तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना काही दिवसांपूर्वी घडली होती.

या अपघातात दशरथ उदल पवार (वय २४), लखन दिलीप पवार (वय १४), व समाधान प्रकाश राठोड (वय ०९) या तिघा युवकांचा जागीच मृत्यू झाला. तसेच उदल गणपत पवार व दिलीप उदल पवार हे दोघे गंभीर जखमी असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मयत समाधान प्रकाश राठोड हा देखील मयत दशरथ राठोड याचा शालक होता, १५ दिवसांपूर्वीच दशरथ चा विवाह मयत समाधान याच्या मोठ्या बहिणीशी झाला होता. या घटनेची माहिती मिळताच आ.मंगेश चव्हाण यांनी तात्काळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये भेट देऊन कुटुंबियांचे व ग्रामस्थांचे सांत्वन करत शासकीय यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या.

त्यानंतर तालुका प्रशासनाशी समन्वय साधून पंचनामे व इतर प्रशासकीय प्रक्रिया झपाट्याने पूर्ण करण्यात आल्या. त्यामुळे अवघ्या दोनच दिवसांत चाळीसगाव तालुक्यातील दोघा मृत व्यक्तींचे लखन दिलीप पवार, दशरथ उदल पवार यांच्या वारसांना प्रत्येकी ४ लाख प्रमाणे एकूण ८ लाख सानुग्रह अनुदान DBT प्रणालीद्वारे थेट बँक खात्यात जमा करण्यात आले. तिसरा मृत युवक समाधान राठोड हा कन्नड तालुक्यातील रहिवासी असल्याने त्याच्या वारसांना तातडीने मदत मिळण्यासाठी कन्नड तहसीलदार यांच्यामार्फत प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या घटनेने संपूर्ण परिसर शोकमग्न असताना आ.मंगेश चव्हाण यांनी दाखवलेली संवेदनशीलता, तत्परता व प्रशासनातील गतिमानता ही कौतुकास्पद आहे.





> **मयतांच्या कुटुंबीयांना एकटे पडू देणार नाही-आ.चव्हाण**
>
> कोंगानगर येथील एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यामुळे जो दुखा:चा डोंगर पवार कुटुंबावर कोसळला आहे, त्याचा विचार देखील करणे शक्य नाही. त्यांचे झालेले नुकसान कधीच न भरून येणारे जरी असले तरी लोकप्रतिनिधी या नात्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करून या कुटुंबाला ८ लाखांची आर्थिक मदत देऊन आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. भविष्यात इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून देखील पवार कुटुंबाला आधार देण्यासाठी मी त्यांच्या पाठीशी राहील अशी प्रतिक्रिया आ.मंगेश चव्हाण यांनी यावेळी दिली.



## उधना-पंढरपूर स्पेशल रेल्वेगाडीला मंजुरी-खा.स्मिता वाघ यांचा पुढाकार

अमळनेर । प्रतिनिधी

रेल्वे मंत्रालयाने 'उधना-पंढरपूर स्पेशल ट्रेन'ला अधिकृत मंजुरी दिली आहे. खा.स्मिताताई वाघ यांचा वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढाकाराने हि सेवा सुरू झाली आहे.

पंढरपूरची वारी- श्रद्धेची चालती परंपरा, जिथे लाखो भाविक विठ्ठल नामाचा गजर करत पायी चालत विठुरायाच्या दर्शनासाठी निघतात. या पवित्र यात्रेला खान्देश आणि दक्षिण गुजरातमधून दरवर्षी हजारो वारकरी सहभागी होतात. त्यांच्या सेवेसाठी, सोयीसाठी आणि सुरक्षित प्रवासासाठी खासदार स्मिताताई वाघ यांनी घेतलेला महत्त्वपूर्ण पुढाकार आता यशस्वी झाला आहे.

**स्पेशल गाडी :** गाडी क्र. ०९०७९/०९०८०, दि.४ जुलै २०२५, गाडी क्र. ०९०८१/०९०८२ दि.५ जुलै २०२५, **पंढरपूरहून परतीचा प्रवास:** ५ व ६ जुलै २०२५ असा राहणार असून या स्पेशल ट्रेनचा मार्ग : उधना-नंदुरबार - अमळनेर-धरणगाव-जळगाव-मनमाड-पंढरपूर असा असेल.

खा.स्मितातार्इंनी रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव यांच्यासोबत तसेच पश्चिम रेल्वेचे महाप्रबंधक यांच्याशी वेळोवेळी चर्चा करत ही मागणी प्रभावीपणे मांडली.

त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना केंद्र सरकारची त्वरित मान्यता मिळाली ही गाडी केवळ प्रवासाचे साधन नसून, भाविकांच्या मनातील विठ्ठल भेटीचा दुवा आहे. विशेषतः वयोवृद्ध, महिला, लहान मुले व युवकांसाठी हा प्रवास आता अधिक सुरक्षित, सुलभ व सन्माननीय ठरणार आहे.

**वारी म्हणजे चालणं नव्हे** – ती श्रद्धेची, भक्तीची आणि संस्कृतीची ओळख आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी हजारो वारकरी जीव ओतून मार्गस्थ होतात. त्यांच्या सेवेसाठी 'उधना-पंढरपूर' स्पेशल ट्रेन मिळवणं हे माझं कर्तव्यच होत. ही ट्रेन म्हणजे भाविकांसाठी विठुरायाचं एक वरदानच ठरेल असे खा.स्मिता वाघ म्हणाल्या.

## मध्य प्रदेश-महाराष्ट्र सीमेवरील जमीन वाद ४० वर्षांनंतर मिटला

बऱ्हाणपूर । प्रतिनिधी

मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील एक रस्ता बराच काळ बंद होता. ४० वर्षांनंतर आता हा प्रश्न सुटला आहे. हा रस्ता मध्य प्रदेशातील बऱ्हानपूर जिल्ह्यातील लोणी गाव आणि महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील रावेर तहसीलमधील चोरवाड गावाला जोडतो. सदर शेतकऱ्यांनी ४-४ फूट जमिनीवर पिके लावून रस्ता अडवला होता. त्यामुळे सुमारे १.५-२ किलोमीटरचा रस्ता अडवला गेला होता. मंगळवारी झालेल्या जनसुनावणीत एका शेतकऱ्याच्या तक्रारीनंतर बुरहानपूरचे जिल्हाधिकारी हर्ष सिंह यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले. त्याचप्रमाणे जळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनीही या प्रकरणाची दखल घेतली.

बऱ्हानपूर तहसीलदार प्रवीण ओहरिया म्हणाले की, लोणी गावाची सीमा महाराष्ट्राशी आहे. तर महाराष्ट्रातील रावेर तहसीलमधील चोरवड गावापासून सीमा सुरू होते. दोन्ही राज्यांतील शेतकऱ्यांच्या वाहतुकीसाठी सरकारी नोंदींमध्ये दोन किलोमीटरचा मार्ग होता, परंतु अतिक्रमणामुळे शेतकऱ्यांना शेतीची उपकरणे आणि वाहने वाहून नेण्यात अडचणी येत होत्या. त्यानंतर बुधवारी बऱ्हानपूर जिल्हाधिकारी आणि जळगाव जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार बुरहानपूर तहसीलदार प्रवीण ओहरिया आणि रावेर तहसीलदार बंडू कापसे यांनी लोणी गावात पोहोचून शेतकऱ्यांशी चर्चा केली. दोन्ही राज्यांच्या महसूल पथकाने तिथे पोहोचून सरकारी नोंदींच्या आधारे शेतांचे मोजमाप केले आणि रस्त्यावर आढळलेले अतिक्रमण ओळखून ते हटवण्याची कारवाई केली. परस्पर संमतीने एका शेतकऱ्याने स्वतः जेसीबीने केळीचे पीक काढून टाकले.

# वाकडी प्रा.आ.केंद्रांतर्गत सात उपकेंद्रांमध्ये महिलांची आरोग्य तपासणी, सिकलसेल जनजागृती

वाकडी, ता.जामनेर । वार्ताहर

वाकडी तालुका जामनेर वार्ताहर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येत असलेल्या सात उपकेंद्रामध्ये जागतिक सिकलसेल दिनानिमित्त गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करून सिकलसेलविषयी जनजागृतीवर भर देऊन जागतिक सिकलसेल दिनानिमित्त दि.१९ जून रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वाकडी अंतर्गत सात उपकेंद्र येथे गर्भवती महिलांसाठी एका विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ.राजेश सोनवणे तालुका आरोग्य अधिकारी जामनेर यांच्या वतीने राबवण्यात आलेल्या या उपक्रमात, सिकलसेल आजाराबद्दल जनजागृती करण्यावर आणि प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देण्यावर विशेष भर देण्यात आला. या शिबिरात १०९ गर्भवती महिलांच्या आरोग्याची सखोल तपासणी करण्यात आली.

किशोर वयीन मुली, ४० वर्षाआतील २११अशी एकूण ३२० जणांची सिकल सेल तपासणी करण्यात आली. शिबिराला वैद्यकीय अधिकारी डॉ. सागर पाटील, डॉ.किरण पाटील, आरोग्य सहाय्यक विक्रमसिंग राजपूत, आरोग्य सहाय्यक अमित तडवी, आरोग्य सहाय्यिका सुरेखा गोसावी, आरोग्य सहाय्यिका शोभा घाटे,सामुदाय अधिकारी,आरोग्य सेवक आरोग्य सेविका, आशा वर्कर कर्मचारी उपस्थित होते.

तसेच डायबिटीससाठी तपासणी इयत्ता ७ वी ९ वी मधील १२१ विद्यार्थीची तपासणी करण्यात आली.



# वैजापूर येथे विनापरवाना बियाणे, रासायनिक खतांची विक्री

## भरारी पथकाचा कृषी केंद्रावर छापा, साडेसात लाखांचा साठा जप्त

चोपडा । प्रतिनिधी

कृषी विभागाचा कोणताही परवाना नसतांना कृषी केंद्र थाटून राजरोसपणे बी-बियाणे आणि रासायनिक खतांची शेतकऱ्यांना विक्री करणाऱ्या अनाधिकृत विक्रेत्यावर कृषी विभागा च्या भरारी पथकाने गुरुवारी छापा टाकून साडेसात लाख रुपये किंमतीचा बी-बियाणे व रासायनिक खतांचा साठा जप्त करण्यात आल्या ची घटना आदिवासी भागातील वैजापूर येथे घडली.

भरारी पथकाच्या कारवाईने बोगस बियाणे व रासायनिक खते विक्रेत्यांमध्ये खडबळ उडाली आहे. या बाबत ग्रामीण पोलीस स्टेशनला कृषी केंद्र चालक योगीराज देवसिंग पाटील यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चोपडा तालुक्यातील वैजापूर येथे परवाना नसतांना न्यू कृषी केंद्रावर राजरोसपणे बी- बियाणे व रासायनिक खतांची शेतकऱ्यांना विक्री होत असल्याची गोपनीय माहिती कृषी विभागा च्या भरारी पथकाला मिळाली त्यावरून १९ जून रोजी संध्याकाळी भरारी पथकातील जिल्हा गुणवत्ता नियंत्रण अधिकारी विकास बोरसे, मोहीम अधिकारी अविनाश पाटील, पंचायत समितीचे कृषी अधिकारी किरण पाटील, हातेड भागाचे कृषी मंडळ अधिकारी रामचंद्र पाटील यांनी वैजापूर येथील न्यू कृषी केंद्रावर अचानक छापा टाकला असता दि.२५ मे २०२५ पासून विना परवाना अनाधिकृतपणे बी-बियाणे व रासायनिक खते विक्री होत असल्याचे आढळून भरारी पथकाला आढळून आले. यावेळी पथकातील अधिकाऱ्यांनी दुकानाची तपासणी केली असता कृषी केंद्रात विना परवाना विक्रीसाठी साठवून ठेवलेले सुमारे ४,५२,४४६ रुपयांचे वीस टन रासायनिक खतांच्या ४०५ गोण्या,२,८३,४१८ रुपयांचा मका व कापूस बियाण्यांचे १८८ पाकीटे असा एकूण-७,३५,८६४ रुपयांचा साठा जप्त करण्यात येऊन विक्री बंदचा आदेश देण्यात आला.

जिल्हा गुणवत्ता नियंत्रण अधिकारी विकास बोरसे यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस स्टेशनला न्यू कृषी केंद्राचे चालक योगीराज देवसिंग पाटील (३०) रा.नागलवाडी ता.चोपडा यांचे विरुध्द बियाणे नियंत्रण कायदा-१९६६, बियाणे नियंत्रण आदेश-१९८३, खत नियंत्रण कायदा-१९८५ व अत्यावश्यक वस्तू कायदा- १९५५ यातील कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई मुख्य गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुर्बान तडवी, कृषी विकास अधिकारी पदमनाभ म्हस्के यांच्या मार्गदर्शना खाली भरारी पथकाने केली.




**जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव.**

**जाहिर नोटीस**

(टी.डी.आर. प्रस्तावा बाबत)

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, १) जळगाव शहराची सुधारीत विकास योजना (जुनी हद्द) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५८८/१९४/ सी.आर/९७/युडी-९, दि.०६/१/१९९३ अन्वये मंजुर केलेली असुन वाढीव हद्दीची विकास योजना अधिसुचना क्र.टी.पी.एस. ३५९९/७३८/सी. आर/१४२ (अ) युडी-९,दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दिनांक ०७/०४/२००२ पासुन अंमलात आहे. तसेच वाढीव हद्दीची वगळलेल्या भागाची विकास योजना (ईपी) शासनाने अधिसुचना क्र.टि.पी.एस. ३५०३/४९३/सीआर/१०२/(ए)/०३/युडी-९,दि.१०/०८/२००४ द्वारे मंजुर केलेली आहे. सदरची विकास योजना दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आहे.

विकास योजना अंतर्गत आरक्षित जागा/विकास योजना रस्ते, इत्यादी जळगाव शहर महानगरपालिकेस हस्तांतरणीय विकसन हक्क (टी.डी.आर) च्या मोबदल्यात देणे संदर्भिय खालीलप्रमाणे प्रस्ताव जमीन मालकांकडून प्राप्त झाले आहे.

| अ. क्र. | प्रस्ताव प्राप्त दि. | जमीन मालकाचे नाव | शिवार | स.नं./ ग.नं. | वि.यो. प्रयोजन | बाधीत क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०४/१०/२०२४ | योगेश पुंडलीक वंजारी व इतर ०५ | मेहरुण | ४५८/१अ/२ब | १२.०० मी रुंद वि.यो.रस्ता | १४८८.०० |

वर उल्लेख केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी त्यांचे वर नमुद सदर मिळकत निर्वेध निर्जोखमी बोजे विरहीत असल्याची सदर मिळकत बाबत कोणत्याही कोर्टात वाद प्रलंबित नसल्याबाबत तसेच त्यांना हस्तांतरणीय विकास हक्क (डी.आर.सी) प्राप्त करुन घेण्याचे हक्क व अधिकार असल्याची तसेच सदर मिळकत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसुन त्यावर जप्ती अगर मनाईचा हुकूम नाही अशी खात्री व भरोसा आम्हास दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, बक्षीस, ताबा, पोटगी ताबा, कुळ खंड, साठेखत, खरेदीखत इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना जळगाव महानगरपालिका जळगाव यांचेकडे समक्ष लेखी निवेदन मुळ कागदपत्रानिशी सादर करुन त्याबाबत खात्री पटवून द्यावी.

येणेप्रमाणे मुदतीत कोणतेही आक्षेप न आल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणताही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक सोडून दिले असल्याचे समजण्यात येईल. सदर मिळकतीचे आरक्षित क्षेत्राच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर.सी) वर नमुद जागा मालकांना देण्यात येईल. त्यानंतर कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :-
ठिकाण :- जळगाव,
**मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार**

**सही/-**
**सहायक संचालक, नगररचना**
**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**